**ठळक बातम्या**

- आत्मनिर्भरता आणि **वोकल फॉर लोकल** हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- **यूपीएससी** परीक्षेत निवड न झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी **प्रतिभासेतू** डिजिटल व्यासपीठ स्थापन केल्याची प्रधानमंत्र्यांनी दिली माहिती

- शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांची चीनच्या अध्यक्षांबरोबर चर्चा

- अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत भारतीय खेळाडू युकी भांबरी, अनिरुद्ध चंद्रशेखर आणि विजय प्रशांत यांची आगेकूच

**आणि**

- प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचं निधन

**<><><><>**

आत्मनिर्भरता आणि **वोकल फॉर लोकल** हा मंत्र घेऊन देशानं पुढे जायला हवं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मन की बात या कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात त्यांनी आकाशवाणीद्वारे आज देशवासियांना संबोधित केलं. येत्या काळात देशभरात सणांची धामधुम असेल. या काळात स्वदेशीचा मंत्र विसरू नका, पेहराव, सजावट, उपाहार या सर्व गोष्टी स्वदेशी असाव्यात, असं आग्रही प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी केलं. तसंच उत्सवाच्या काळात स्वच्छता पाळण्याचा सल्ला दिला.

- **- -होल्ड बाईट वोकल-लोकल - -**

**यूपीएससी** परीक्षेत अपयश येणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर परीक्षांसाठी तयारी करता यावी यासाठी **प्रतिभासेतू** हे डिजिटल व्यासपीठ तयार केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. यूपीएससी परीक्षेत सर्व टप्पे उत्तीर्ण करणाऱ्या मात्र अंतिम गुणवत्ता यादीत नाव नसलेल्या विद्यार्थ्यांचा सर्व डेटा प्रतिभासेतू पोर्टलमधे जमा करण्यात आला आहे. या पोर्टलमधे यूपीएससी उमेदवारांसह अभियंता, वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवू बघणाऱ्या पण

अपयश आलेल्या विद्यार्थ्यांची माहितीही आहे. या पोर्टलद्वारे माहिती घेऊन खासगी कंपन्या या विद्यार्थ्यांना नोकरी देणार आहेत. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

**जम्मू काश्मीर**मधल्या दाल सरोवरात नुकत्याच झालेल्या **खेलो इंडिया जलक्रीडा** महोत्सवाचा प्रधानमंत्र्यांनी आपल्या संबोधनात विशेष उल्लेख केला. या स्पर्धेतले सुवर्णपदक विजेते खेळाडू ओदिशा इथली रश्मिता साहू आणि श्रीनगरमधला मोहसीन अली यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला आणि त्यांचं अभिनंदन केलं. एक भारत – श्रेष्ठ भारत ही भावना देशाच्या एकात्मतेसाठी आवश्यक असून खेळ यात महत्त्वाची भूमिका बजावतात असं प्रधानमंत्री म्हणाले.

देशातल्या **सौरऊर्जा** प्रकल्पांच्या प्रयोगाबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सौरऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांचं जीवनमान बदलत असून त्याला त्याच्या मेहनतीचं फळ कैकपटीने जास्त मिळत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी बिहारमधल्या शेतकरी देवकी यांच्या प्रयोगाची माहिती दिली. आधी कोरडवाहू शेती करणाऱ्या देवकी यांनी सौर ऊर्जा पम्पाचा प्रयोग आपल्या गावात केला, त्यामुळे चाळीस एकर शेती सिंचनाखाली आली. त्यांच्या या प्रयोगाचं अनुकरण इतर शेतकरीही करत आहेत, असं सांगत प्रधानमंत्र्यांनी त्यांचा गौरव केला.

**१५ सप्टेंबरला** साजरा केल्या जाणाऱ्या महान अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंतीनिमित्त तसंच १७ सप्टेंबरला साजऱ्या केल्या जाणाऱ्या विश्वकर्मा जयंतीच्या मोदी यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सोनार, लोहार, सुतार , मूर्तीकार यानी देशाच्या प्रगतीचा पाया घातला आहे, असं ते म्हणाले. १७ सप्टेंबरला देशभरात **हैदराबाद मुक्तीसंग्राम दिवस** साजरा केला जाणार असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. रझाकार आणि निजामाच्या अत्याचाराविरोधात लढलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचं त्यांनी स्मरण केलं तसंच देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची एक ध्वनिफीत श्रोत्यांना ऐकवली.

**पहिल्या महायुद्धापासून** आतापर्यंतच्या शहीद जवानांची माहिती आणि छायाचित्र जतन करणारे जितेंद्र सिंह राठौड यांचा प्रधानमंत्र्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांनी

हजारो शहीदांच्या मातापित्यांची पायधूळ आपल्याकडे जतन केली असून सैनिकांप्रति त्यांचं प्रेम आणि आदर आपल्याला देशभक्तीची शिकवण देतो, असं प्रधानमंत्री म्हणाले.

मागच्या काही दिवसात देशभरात **अतिवृष्टी** आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या जीवितहानी आणि वित्तहानीबद्दल प्रधानमंत्र्यांनी दुःख व्यक्त केलं. तसंच या काळात एनडीआरएफ, एसडीआरएफ, डॉक्टर आणि मदत करणाऱ्या सर्व नागरिकांचं कौतुक केलं.

**मध्यप्रदेशातल्या शहडोल** या फूटबॉलप्रेमी गावातल्या काही खेळाडूंना जर्मनीतील फूटबॉल प्रशिक्षक डायटमार बेयर्सडॉर्फर यांनी जर्मनीतल्या अकादमीत प्रशिक्षण देण्याची तयारी दाखवल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. एका मुलाखतीत प्रधानमंत्र्यानी शहडोल या गावातल्या फूटबॉलवेडाबद्दल सांगितलं होतं, ते ऐकल्यानंतर बेयर्सडॉर्फर यांनी इथल्या खेळाडूंना प्रशिक्षण देण्याची तयारी दाखवली.

**भारतीय संस्कृती**चा प्रभाव जगातल्या छोट्या छोट्या शहरातही दिसून येतो असं प्रधानमंत्री म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यानीं महर्षी वाल्मिकी यांच्या मूर्तीची स्थापना करणाऱ्या इटलीमधल्या कँपरोतोंदो या शहराचं उदाहरण दिलं. कॅनडामधल्या मिसीसागा इथं प्रभू श्रीरामाच्या ५१ फुटी मूर्तीचा उल्लेखही त्यांनी केला. तसंच रशियामधल्या व्लादिवोस्तोक इथं शाळकरी मुलांनी रामायणातल्या कथांवर आधारित चित्रांचं प्रदर्शन भरवल्याचं सांगत भारतीय संस्कृतीचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यात होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**<><><><>**

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी स्थानिक गणपती मंडळाला भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम त्यांनी इथं रहिवाशांसोबत ऐकला.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा केली. चीनमधे तियानजिन इथं झालेल्या बैठकीत केलेल्या चर्चेची ध्वनिफीत प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी कजान इथं जिनपिंग यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनंतर भारत- चीन संबंधांना सकारात्मक दिशा मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. सरहद्दीवरुन दोन्ही देशांचं सैन्य मागे हटल्यानंतर वातावरण शांत आहे. कैलास मानसरोवर

यात्रा पुन्हा सुरु झाली असून दोन्ही देशांदरम्यान थेट हवाई सेवाही लवकरच सुरु होईल, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दिली. भारत-चीन संबंध उभय देशातल्या जनतेबरोबरच जगासाठी कल्याणकारी ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

.... **होल्ड - बाईट- प्रधानमंत्री - - -**

शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर बैठकीसाठी प्रधानमंत्री चीनच्या दौऱ्यावर आहेत. या बैठकीकरता तिएनजिन मधे आलेल्या इतर राष्ट्रप्रमुखांबरोबरही ते द्विपक्षीय बैठका घेणार आहेत.

**<><><><>**

शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीकरता रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आज सकाळी चार दिवसांच्या दौऱ्यासाठी चीनमध्ये तिआनजिन इथं पोचले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या त्यांच्याबरोबर महत्त्वपूर्ण विषयांवर द्विपक्षीय चर्चा करतील.

**<><><><>**

ब्रिक्स देशांवरच्या पक्षपाती निर्बंधांना रशिया आणि चीनचा विरोध आहे असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी आज एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केलं.

**<><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या आगामी अधिवेशनासाठी पॅलेस्टिनच्या प्रतिनिधींना व्हिसा न देण्याच्या निर्णयाचा अमेरिकेने पुनर्विचार करावा असं युरोपीय संघामधल्या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटलं आहे. आमसभेच्या येत्या अधिवेशनाला उपस्थित राहाण्यासाठी पॅलेस्टाईन लिबरेशन आर्मीच्या सदस्यांना व्हिसा न देण्याचा निर्णय अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने नुकताच जाहीर केला.

**<><><><>**

महाराष्ट्रात सरकारनं अद्याप मागण्या मान्य न केल्यानं उद्यापासून कडक उपोषण करणार असून पाणीही घेणं बंद करण्याची घोषणा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज केली. मुंबईच्या आझाद मैदानावर सध्या सुरू असलेल्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस असून त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला.

दरम्यान, जरांगे यांनी केलेल्या मागण्यांसंदर्भात आज संध्याकाळी महाधिवक्त्यांशी चर्चा करणार असल्याची माहिती उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

**<><><><>**

यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा जोडीदार न्यूझीलंडचा मायकल व्हीनस यांनी अमेरिकेच्या मार्कोस गिरॉन आणि लर्नर टिएन या जोडीवर विजय मिळवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तर दुसऱ्या सामन्यात अनिरुद्ध चंद्रशेखर आणि विजय प्रशांत या भारतीय जोडीनं अमेरिकेच्या क्रिस्तियन हॅरिसन आणि इव्हान किंग यांच्यावर मात करून दुसरी फेरी गाठली.

**<><><><>**

प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचं आज मुंबई जवळ मीरा रोड इथं राहत्या घरी निधन झालं. त्या ३८ वर्षांच्या होत्या. गेला काही काळ त्या कर्करोगाशी झुंज देत होत्या.

मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका आणि मोठ्या पडद्यावरही त्यांनी काम केलं होतं.

"अ परफेक्ट मर्डर", "कोण म्हणतं टक्का दिला?", आणि "तिला काही सांगायचंय" या लोकप्रिय नाटकांमधे त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या होत्या.

छोट्या पडद्यावरच्या "या सुखांनो या" या मालिकेपासून त्यांनी अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली होती. त्यानंतर "चार दिवस सासूचे", "तू तिथे मी", "तुझेच मी गीत गात आहे" अशा अनेक मालिकांमधे त्यांनी काम केलं. "पवित्र रिश्ता" या हिंदी मालिकेतल्या भूमिकेमुळे त्यांना अधिक प्रसिद्धी मिळाली होती.

मोठ्या पडद्यावर त्यांनी गोविंद निहलानी दिग्दर्शित "ती आणि इतर" या मराठी चित्रपटात काम केलं होतं.

**//<><><><>//**